# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.५३२/२३/अ.क्र.६५९८/२५/०१**

**श्री. चक्रधारी मुत्तय्या गोडीसेला**
३७५, मोगल हाऊस, रुम नं. ३५अ,
सिताराम मिल समोर, ना. म. जोशी मार्ग,
डिलाईल रोड, मुंबई-४०००११

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता) जी/दक्षिण विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,
जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय, ५ वा मजला, धनमिल कंपाऊंड,
एन.एम. जोशी मार्ग, परेल, मुंबई ४०० ०१३

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,
जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय, ५ वा मजला, धनमिल कंपाऊंड,
एन.एम. जोशी मार्ग, परेल, मुंबई ४०० ०१३

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १६.१०.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित (प्रतिनिधी) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर द्वितीय अपिलावर आज दि.१६.१०.२०२५रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता) यांचे प्रतिनिधी वरीष्ठ मालमत्ता निरीक्षक श्री. मंगेश शेळके उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असे विशद केले की, मूळ माहिती अर्जात मागणी केलेली माहिती प्राप्त झाली नाही.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी श्री. चक्रधारी मुत्तय्या गोडीसेला यांनी दि.०४.१०.२०२२ रोजी दाखल जोडपत्रानुसार त्यांचे वडील मुत्तय्या लक्ष्मण गोडिसेला यांचे ३७५, मोगल हाऊस, रुम नं. ३५-अ, सिताराम मिल समोर, ना.म.जोशी मार्ग, डिलाईल रोड, मुंबई-४०००११ येथील पत्त्यावर त्यांचे नावे करण्यासाठी जे जे पुरावे जोडले होते, त्यांची छायांकित प्रत मागितली असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता अधिकारी जी/दक्षिण विभाग

यांनी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने कुठलेही कागदपत्रे कार्यालयात कसून शोध घेतला असता आढळून आले नसल्याचा प्रतिसाद दिला आहे. त्यावर दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जात तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण विभाग यांनी अभिलेखावरील उपलब्ध माहिती दिली असल्याकारणास्तव अपील निकाली काढलेले आहे. तथापि त्यानंतरही अपिलार्थी यांच्या विनंती अर्जानुसार श्री. मुत्तय्या गोडीसेला यांच्या नावे हस्तांतर झालेल्या कागदपत्रांची उपलब्ध नस्ती गहाळ झाली असल्याने मालमत्ता अधिकारी जी/दक्षिण यांनी महानगरपालिकेच्या सर्व प्राधिकरणांना यांच्या कार्यालयातील कागदपत्रांवर या कार्यालयातील उपलब्ध नस्ती मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे नमूद करीत अभिलेखाचा कसोशीने शोध घेऊन विषयांकित कागदपत्र त्वरित पाठवावे, अशी विनंती केलेली आहे.

तथापि त्यानंतरही कसून शोध घेतला असता उपरोक्त माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांनी केलेली विनंती व संबंधित मालमत्ता यावर त्यांच्या २ पिढ्यांपासून ते राहत असल्याने त्याबाबतीतील कागदपत्रांचा दि.०७.११.२०२२ रोजीच्या मालमत्ता अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीप्रमाणे पुनश्च एकदा अभिलेखाचा शोध घेऊन उपरोक्त कागदपत्रे अपिलार्थी यांना विनामूल्य देण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. वरील अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १६.१०.२०२५**

State Information Commission ★ Maharashtra ★